# जाहिरात
# प्रकल्प प्रेरणा कार्यक्रम
## *कंत्राटी पद भरती करण्याबाबत*

प्रकल्प प्रेरणा कार्यक्रम अंतर्गत कंत्राटी **मनासोपचार तज्ञ (प्रोग्राम ऑफिसर व मनोविकृती परिचारीका या** रिक्त पदाची भरती करण्याकरिता इच्छूक उमेवारांनी कडून अर्ज मागविण्यात येत आहे आपले अर्ज जाहिराती प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ते दिनांक १५/०३/२०१९ पर्यंत **जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, यवतमाळ पोस्ट ग्राऊड जवळ यवतमाळ** येथे कार्यालयीन वेळेत सोबत जोडण्यात आलेल्या अर्ज नमुन्यामध्ये पोस्टाद्वारे किंवा व्यक्तीशः अर्ज सादर यावे. तसेच उशीरा प्राप्त झालेले (प्रत्यक्ष/पोस्टा द्वारे) अर्जाचा विचार केल्या जाणार नाही.

| अ.क्र | पदनाम | शैक्षणीक अर्हता | एकत्रीक मानधन प्रति महा | वयाची मर्यादा | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | मनसोपचार तज्ञ (पोग्राम ऑफिसर) | एम.बी.बी.एस एम.डी / डि.पी.एम (मनोविकृतीशास्त्र) | ७००००/- | ६५ वर्षा पर्यंत | १ |
| २ | समुपदेशन परिचारिका | डि.पी.एन / एम.एस.सी (मनोविकृती शास्त्र) किंवा बि.एस.सी. नर्सींग | २५०००/- | ६० वर्षा पर्यंत | १ |

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती ही पुर्नता कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती झालेल्या उमेदवरास ११ महिन्याची नेमणुक दिली जाईल.

२) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसीक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखला झालेला नसावा. त्याबाबतचे चारित्र प्रमाणपत्र नियुक्ती झाल्या पासुन १ महिन्याच्या आत या कार्यालयात सादर करावा लागेल अन्यथा आपली नियुक्ती आदेश रदद करण्यात येतील.

३) वरिल तक्यातील सर्व पदाकरीता निवड प्रक्रीया ही प्राप्त अर्जाचे संख्येनुसार अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार एका जागेसाठी पाच या पध्दतीचा अवलंब करुन कौशल्य चाचणी व तोंडी मुलाखत घेऊन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. तसेच पात्र व अपात्र उमेदवारांची यादी व इतर माहिती www.yavatmal.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) अर्जदाराने त्यांचा विनंती अर्ज www.yavatmal.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नमुना मध्ये भरुन **जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, यवतमाळ पोस्ट ग्राऊंड जवळ यवतमाळ** या कार्यालयात सादर करण्यात यावा त्यामध्ये खालील बाबी अंतर्गत असाव्या

१. अर्जामध्ये ठळक अक्षरात स्वत:चे नाव, पदाचे नाव, कायमस्वरुपी राहत असलेला पत्ता, दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, शैक्षणीक अर्हतेचे सर्व तपशील-अभ्यासक्रमाचे नाव, संस्था विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण झालेले वर्ष, गुणांची टक्केवारी, कामाचा अनुभव, - काम केलेल्या शासकीय / निमशासकीय संस्था/रुग्णलयाचे नाव, ज्या पदावर काम केलेले आहे त्या पदाचे नाव, कालावधी, पदाची जबाबदारी व मानधन/वेतन तसेच इतर सर्व माहिती नमुद करावी.

२. अर्जासोबत सत्यप्रतीमध्ये असलेले एस.एस.सी, एच.एस.सी गुणपत्रीका व प्रमाणपत्र शाळेचा दाखला, पदवी गुणपत्रीका व प्रमाणपत्र, पदव्युत्तर पदवी गणुपत्रीका व प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, जात वैद्यता प्रमाणपत्र , पासपोर्ट आकाराचे १ फोटो अर्जा सोबत जोडण्यात यावे.

५) उमेदवारानी अर्जासोबत सर्व सत्यप्रती जोडून बंद पाकीट **जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, यवतमाळ पोस्ट ग्राऊड जवळ यवतमाळ** या कार्यालयाच्या ठिकाणी सादर करावा.

६) शासकीय/निमशासकीय संस्थेमध्ये कामकाज केल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

७) सदर रिक्त पदांच्या संख्येत व मानधनात तसेच पदस्थापनेतच्या ठिकाणी बदल होऊ शकतो.

८) सदर पदे करार पध्दतीने भरावयाचे असल्याने एकत्रित मानधना शिवाय अन्य कोणताही भत्ता लागु राहणार नाही. तसेच लेखी परिक्षा / मुलाखतीकरीता येणाऱ्या उमेदवारास दैनिक व प्रवास भत्ता व इतर कोणताही भत्ता कार्यालया कडून मिळणार नाही.

९) सदर पदभरती प्रक्रीयेचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष निवड समिती यांनी राखुन ठेवलेले आहे.

सदस्य सचिव
जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय, यवतमाळ

अध्यक्ष
जिल्हाधिकारी यवतमाळ